# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२३

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील पोलीस उप अधीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१) ५२०८ (१२-११-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणेसह राज्यातील ३५० वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची उप अधीक्षक पदावरील बढती मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याने राज्यातील उपअधीक्षक पदाच्या ३५० जागा रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची उपअधीक्षक पदावरील बढती प्रकरणे निकाली काढून राज्यातील पोलीस उपअधीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०२३) :** (१) व (२) पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (निःशस्त्र) या संवर्गाच्या सन २०२०-२०२१ ची निवडसूची तयार करण्याकरीता पदोन्नती कोट्यातील एकूण २३३ पदे उपलब्ध होती. शासन आदेश, गृह विभाग, दिनांक २०/०५/२०२१, दिनांक २९/१०/२०२१, दिनांक ३०/११/२०२१, दिनांक ०२/१२/२०२१, दिनांक ३१/०१/२०२२, आणि दिनांक २२/०२/२०२२ द्वारे एकूण २०५ पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील आरोग्य सेविकांनी किमान वेतनाच्या मागणीसाठी धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिल्याबाबत

**(२) ६७८८ (१५-०३-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चार हजार आरोग्यसेविकांनी किमान वेतनाच्या मागणीसाठी आझाद मैदान येथे धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घरोघरी फिरुन बालकांचे लसीकरण करणे, "अ" जीवनसत्व वाटप, जंतुनाशक कार्यक्रम, स्त्री-पुरुष नसबंदी व संसर्गजन्य आजाराचे रुग्ण शोधणे अशी कामे ह्या आरोग्य सेविका करीत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई महानगर पालिकेने या आरोग्यसेविकांना नियुक्त केले असून त्यांना मासिक मानधन देते, परंतु कामगार आयुक्तालयाने किमान वेतन मिळावे असे निर्देश दिले असताना देखील त्यांना किमान वेतन देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर आरोग्य सेविकांना किमान वेतन मिळावे याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) महिला आरोग्य सेविकांचे मानधन दिनांक ०१/०६/२०२२ पासून रुपये २,०००/- इतके वाढवून ते रुपये ११,०००/- इतके करण्यात आले आहे. तसेच, सदर मानधनात दिनांक ०१/०४/२०२३ पासून आणखी रुपये १०००/- ची वाढ करुन ते दरमहा रुपये १२,०००/- इतके करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई रेल्वे पोलीस दलासह शहर पोलीस आणि अन्य पोलीस विभागातून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन अदा करण्याबाबत

**(३) ११७४२ (२२-११-२०२२) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई रेल्वे पोलीस दलासह शहर पोलीस आणि अन्य पोलीस विभागातील कर्मचाऱ्यांना गत अनेक महिन्यांपासून निवृत्ती वेतन मिळाले नसल्याचे दिनांक १ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेवापुस्तक (सर्व्हिस बुक) पडताळणीसाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन असे पर्याय असल्यामुळे अधिकारी/कर्मचारी यांच्यामध्ये गोंधळ निर्माण झाला असून ऑनलाईन प्रक्रिया किचकट (क्लिष्ट) स्वरुपाची असल्याने आणि मर्यादित मनुष्यबळामुळे ऑफलाईन सेवापुस्तक (सर्व्हिस बुक) पडताळणीला अनेक मर्यादा आल्यामुळे निवृत्ती वेतनाची समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरोना संसर्गापूर्वी निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकाचीही (सर्व्हिस बुकची) पडताळणी देखील अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेच्या रक्षणासाठी सेवा निवृत्त झाल्यावर पोलीस आधिकरी/कर्मचारी निराधार होऊ नयेत, यासाठी त्यांचे निवृत्ती वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सेवानिवृत्तीनंतरचे निवृत्ती वेतन सेवानिवृत्ती दिनांकानंतर त्वरीत अदा केले जाते. सेवानिवृत्त झाल्यानंतर निवृत्तीधारकाचे सेवापुस्तकाची पडताळणी होण्यास विलंब होत असल्यास, जर निवृत्तीवेतन धारकाने मागणी/विनंती केली असल्यास त्यांना सहा महिन्यांपर्यंत तात्पुरते निवृत्तीवेतन व तात्पुरते उपदान अंशत: अदा केले जाते.

मुंबई रेल्वे पोलीस दलातील परिक्षेत्रातून दिनांक ०१ डिसेंबर, २०२१ रोजी पर्यंत एकूण ७१६ पोलीस अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहे. त्यापैकी ६११ सेवानिवृत्त पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना नियमित सेवानिवृत्त वेतन सुरु झालेले आहे व १०५ प्रलंबित सेवानिवृत्ती प्रकरणे प्रशासकीय कारणास्तव प्रलंबित होती. प्रशासकीय कारणास्तव ज्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचे निवृत्त वेतन प्रकरण प्रलंबित राहिल्यास त्यांना तात्पुरते सेवानिवृत्त वेतन, तात्पुरते सेवा उपदान, शिल्लक रजेचे रोखीकरण, भविष्य निर्वाह निधीची रक्कम गट विमा योजना या सर्वांचे देय रक्कम नियमाप्रमाणे देण्यात आलेले आहे.
(२) कोविड-१९ संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव सुरू झाल्याने शासकीय कार्यालय पूर्णतः बंद तथा तद्नंतर अंशत: सुरू असल्याने अपुरे मनुष्यबळ व शासन मर्यादा यास्तव समस्या झाली होती. तथापि, सध्या अडचण नाही.
(३) कोरोना संसर्गापूर्वी निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांपैकी बहुतांश कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांची पडताळणी झालेली असून त्यांना सेवानिवृत्ती विषयक लाभ देखील अदा केलेले आहेत.
(४) मुंबई पोलीस मुख्यालयामार्फत सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना विनाविलंब सेवानिवृत्ती वेतन लागू होण्याच्यादृष्टीने विशेष वेतन पडताळणी पथक स्थापन करण्यात आले होती. तसेच सध्या वेतन पडताळणी काम शिघ्रगतीने व्हावे यासाठी संचालनालय, लेखा व कोषागार, मुंबई यांचे वेतन पडताळणी पथक कार्यरत असून सन २०२५ पर्यंतची सेवापुस्तके पडताळणीचे काम सध्या सुरु आहे.
(५) सन २०१६ ते २०२१ या कालावधीतील जवळ जवळ ५६९७ सेवापुस्तकांची पडताळणी करून अंतिमतः प्रमाणित केल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचे लाभ अदा करणे शक्य झाले आहे. त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील अनुकंपा तत्वावरील यादीत आईचे जागी मुलीचे नाव समाविष्ट करून नोकरीवर सामावून घेणेबाबत

**(४) १३६०७ (२२-११-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोधनी रेल्वे (जि.नागपूर) येथील श्रीमती शबाना मनोज बाविस्कर यांचे पती स्व. मनोज बाविस्कर नापोशि १५९० हे जिल्हा पोलीस अधीक्षक, नागपूर यांचे अधिनस्थ सेवेत कार्यरत असताना दिनांक १६ सप्टेंबर २०१३ रोजी त्यांचा अकस्मात मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यांस, अनुकंपा तत्वानुसार मृत पतीचे जागी नोकरी मिळणेकरीता त्यांच्या पत्नी श्रीमती शबाना यांनी माहे डिसेंबर, २०१३ मध्ये अर्ज सादर केला होता परंतु या दरम्यान त्यांनी कमाल वयोमर्यादा पार केल्यामुळे अनुकंपा यादीतून त्यांचे नाव कमी करण्यात आल्याने त्यांनी आपले जागी त्यांची मुलगी कु. सिमरन हिच्या नावाचा समावेश करणेबाबत शासनास विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कुटुंबाचा चालविणे सुलभ व्हावे या हतूने विशेष बाब म्हणून शासनाने त्यांचे मुलीचे नाव अनुकंपा यादीत समाविष्ट करून तिला नोकरीवर सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २० मे, २०१५ अनुसार पात्र वारसाचे नाव प्रतिक्षासूचीवर घेतल्यानंतर अशा अनुकंपा प्रतिक्षायादीतील उमेदवाराऐवजी अन्य उमेदवाराचे नाव बदलण्याची तरतूद नसल्यास श्रीमती बाविस्कर यांची विनंती मान्य करता येऊ शकत नाही. यासंदर्भात पोलीस अधीक्षक, नागपूर यांनी श्रीमती बाविस्कर यांना दिनांक ०४ मे, २०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुण्यातील कात्रज कोंढवा रस्त्यावर ओंकार सोसायटी येथे लोंबकळणाऱ्या विजेच्या वाहिनीचा धक्का बसल्यामुळे मुलाचा मृत्यू झाल्याबाबत

**(५) १५४४२ (१८-१२-२०२२) श्री.महादेव जानकर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील कात्रज कोंढवा रस्त्यावर ओंकार सोसायटी येथे लोंबकळणाऱ्या विद्यूत वाहिनीचा धक्का बसल्यामुळे ऋषिकेश मंजुनाथ पुजारी, वय वर्षे १४ या मुलाचा दिनांक ३० ऑक्टोबर, २०२२ रोजी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेमुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी महावितरण कार्यालयासमोर आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महावितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळे मुलाचा मृत्यू झाल्यामुळे सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना महावितरण कंपनीकडून आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना महावितरण कंपनीकडून आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

श्री.ऋषिकेश मंजुनाथ पुजारी, वय-१४ वर्षे यांना ओमकार सोसायटी, कात्रज कोंढवा रोड येथे दिनांक २३/१०/२०२२ रोजी सायंकाळी ५.४५ वा. अप्राणांतिक अपघात झाला आणि उपचारादरम्यान दिनांक ३०/१०/२०२२ रोजी त्याचा मृत्यू झाला.
(२) हे खरे आहे.

सदर घटनेबाबत दिनांक ३१/१०/२०२२ रोजी बिलवा समाज संघ, पुणे यांनी महावितरण, पद्मावती विभागीय कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन सादर केले होते.
(३) सदरील अपघात प्रकरणी विद्युत निरीक्षक, पुणे यांनी घटनास्थळाची चौकशी करुन त्याचा अहवाल महावितरण कार्यालयास दिनांक २८/११/२०२२ रोजी सादर केला आहे. अहवालानुसार अपघातग्रस्ताचा कायदेशीर वारसास नियमाप्रमाणे नुकसान भरपाई अदा करण्यात यावी, असे नमूद केले आहे.
(४) होय, अपघातग्रस्ताच्या वडीलांना महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे आर्थिक मदत रक्कम रुपये ४,००,०००/- दिनांक ११/०७/२०२३ रोजी अदा करण्यात आली.
(५) सदर अपघाताबाबत शासनाच्या विद्युत निरीक्षक, पुणे कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. विद्युत निरीक्षक पुणे यांच्या अहवालानुसार अपघातग्रस्ताचा कायदेशीर वारसास नियमाप्रमाणे नुकसान भरपाई अदा करण्यात यावी असे नमूद केले आहे. तसेच अपघाताग्रस्ताचे वडील श्री.मंजुनाथ होन्नया पुजारी यांनी दिनांक ११/०१/२०२३ रोजी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन, पुणे येथे श्री.शिवलिंग शरणाप्पा बोरे, सहा. अभियंता, कात्रज शाखा कार्यालय यांच्याविरोधात एफ.आय. आर. दाखल केली आहे. तसेच सदर अपघातग्रस्ताच्या वडीलांना महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे आर्थिक मदत रक्कम रुपये ४,००,०००/- दिनांक ११/०७/२०२३ रोजी अदा करण्यात आली.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील हतनूर धारणांतर्गत बाधित क्षेत्र संपादित करण्याबाबत

**(६) १६१६९ (२९-१२-२०२२) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील धरणाच्या लाभक्षेत्रात गाळाची पातळी वाढल्याने संपादित क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्र वारंवार बाधित होत असल्याने सदर बाधित क्षेत्राची मोजणी करुन संपादित करण्याबाबत सन २००९ मध्ये शासन निर्णय पारीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासन निर्णयानुसार जळगाव जिल्ह्यातील हतनूर धरणांतर्गत मोजणीनंतर किती क्षेत्र बाधित होत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जळगाव जिल्ह्यातील हतनूर धरणांतर्गत बाधित क्षेत्र संपादित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

बुडीत क्षेत्रातील संपादित जमिनीपेक्षा जादा जमीन पूर परिस्थितीच्या वेळी वारंवार पाण्याखाली जात असल्यास जमिनी संपादनाबाबत शासन निर्णय दिनांक २१/०९/२०१२ पारीत करण्यात आला आहे.
(२) शासन निर्णय दिनांक २१/०९/२०१२ ला अनुसरून क्षेत्रिय कार्यालयास भुधारकांच्या प्राप्त तक्रारीनुसार अतिरिक्त १.८ हे. इतके क्षेत्राच्या भुसंपादनाची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
(३) महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) नाशिक यांचेमार्फत हतनुर धरणाचे गाळ सर्वेक्षण सन २०१८ मध्ये करण्यात आले असून, त्यावरुन ४५.५६% इतके गाळाचे प्रमाण धरणात आढळून आले आहे. तसेच धरणाचे मंजूर पूर्ण संचय पातळी २१५.५० मी. मध्ये गाळामुळे कोणतीही वाढ होत नाही. त्यामुळे कोणतेही क्षेत्र बाधित झालेले नाही. तथापि, वारंवार पाण्याखाली बुडीत क्षेत्राव्यतिरिक्त काही जमिनी जात असल्याने व त्याबाबत शेतकऱ्यांकडुन तक्रार प्राप्त झाल्याने अतिरिक्त १.८० हे. इतके क्षेत्र संपादनाची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## मौजे मनेगाव (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) येथील राहाता पोलीस ठाण्यांतर्गत असलेल्या ग्रामपंचायत क्षेत्रात कोल्हाटी समाजात वयात आलेल्या मुलींनी लग्नाआधी परपुरुषाशी शारिरिक संबंध ठेवण्याची प्रथा असल्याबाबत

**(७) १७२३२ (२५-०३-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मनेगाव (ता.कोपरगाव,जि.अहमदनगर) येथील राहाता पोलीस ठाण्यांतर्गत असलेल्या ग्रामपंचायत क्षेत्रात कोल्हाटी समाजात वयात आलेल्या मुलींनी लग्नापूर्वी परपुरुषांशी शारिरिक संबंध ठेवण्याची प्रथा सुरू ठेवण्यात आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मनेगाव या गावात असलेल्या कोल्हाटी समाजातील मुलीला तिच्या आईच्या इच्छेनुसार व समाजातील चालीरितींनुसार परपुरुषाशी लैगिक संबंध ठेवण्याचा आग्रह धरला जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मनेगाव या गावात असलेल्या कोल्हाटी समाजातील मुलीने विरोध केल्यावरही तिच्या आईच्या संमतीने तिच्यावर जबरदस्ती करून लैंगिक अत्याचार केले याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी त्याच्यावर कारवाई करण्याबाबत मा.उप मुख्यमंत्री, गृह विभागाला पत्रव्यवहार केलेला आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करून समाजावर, पालकांवर तसेच अत्याचार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१) अशी घटना घडली आहे.

(२) होय.

(३) समर्थन संस्थेच्या प्रतिनिधींनी दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या निवेदनान्वये सदर प्रकरणी कार्यवाही करण्याबाबत मा.उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली आहे.

(४) सदरबाबत राहाता पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४०७/२०२२, कलम ३७६ (२)(आय)(जे), ५०६, ३४ भा.द.वि.सं. बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ६, १६, १७ प्रमाणे दिनांक १६/०९/२०२२ रोजी गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यात आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## फत्तेपूर (ता.जामनेर, जि.जळगांव) येथे विजेचा धक्का लागून दोन वायरमनचा मृत्यू झाल्याची घटना घडल्याने मृताचे नातेवाईकांना आर्थिक मदत देणेबाबत

**(८) १७६५७ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फत्तेपूर (ता.जामनेर,जि.जळगांव) येथे विजेचा धक्का लागून दोन वायरमनचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २४ ऑक्टोबर, २०२२ रोजी घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मृताचे नातेवाईकांना आर्थिक मदत देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक २४/१०/२०२२ रोजी मादनी शिवार फत्तेपुर येथे महावितरणचे कै. श्री.गणेश प्रकाश नेमाडे, वरिष्ठ तंत्रज्ञ यांचा विजेचा धक्का लागून प्राणांतिक अपघात झाला त्याचप्रमाणे तेथे हजर असलेले बाह्य व्यक्ती कै. श्री.सुनिल भरतसिंग चव्हाण यांचा सुध्दा विजेचा धक्का लागून प्राणांतिक अपघात झाला आहे.

(२) अपघात झाल्याबरोबर कंपनीच्या धोरणानुसार मृतांच्या वारसांना तातडीची मदत म्हणून कै. गणेश प्रकाश नेमाडे यांच्या वारसांना आर्थिक सहाय्य/ अंतिम विधीसाठी मदत म्हणून रक्कम रुपये ३९,६२४/- व कै. सुनिल भरतसिंग चव्हाण यांच्या वारसांना रुपये २०,०००/- आर्थिक मदत देण्यात आली आहे. अपघातासंदर्भात विद्युत निरीक्षक जळगाव यांचे अभिप्रायानुसार कै. गणेश प्रकाश नेमाडे, वरिष्ठ तंत्रज्ञ यांच्या वारसांना कंपनीच्या नियमाप्रमाणे नुकसान भरपाई कायद्यानुसार मदत देण्याची कार्यवाही सुरु असून महावितरणद्वारा रुपये १३,१६,५५०/- एवढी रक्कम मंजूर करण्यात आली असून सदर रक्कम औद्योगिक न्यायालयात जमा करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. तसेच कै. सुनिल भरतसिंग चव्हाण यांच्या वारसांना एकूण ४,००,०००/- पैकी तातडीची मदत रुपये २०,०००/- अदा करण्यात आलेली असून उर्वरित मंजूर रुपये ३,८०,०००/- एवढी रक्कम कार्यालयीन पूर्तता केल्यानंतर कै.चव्हाण यांचे वारसास अदा करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तापी पाटबंधारे महामंडळांतर्गत पांझरा मध्यम प्रकल्पाच्या उजव्या वाढीव कालव्यावरील पाटचाऱ्या वितरिकांचे काम तात्काळ सुरू करणेबाबत

**(९) १७६६२ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जळगाव येथील महामंडळाचे कार्यालयात तापी पाटबंधारे महामंडळांतर्गत पांझरा मध्यम प्रकल्पाच्या उजव्या वाढीव कालव्यावरील पाटचाऱ्या वितरिकांचे काम तात्काळ सुरू करणेबाबत दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी आंदोलन केल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निधी मंजूर करुन तापी पाटबंधारे महामंडळा अंतर्गत पांझरा मध्यम प्रकल्पाच्या उजव्या वाढीव कालव्यावरील पाटचाऱ्या वितरिकांचे काम तात्काळ सुरू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडून पांझरा मध्यम प्रकल्प उजवा वाढीव कालवा किमी २१.८० ते २८.४० मधील वितरिका क्र. १८, १९, २०, २१, २२ आणि वितरीका क्र. २२ वरील उपवितरीका यांची विस्तार व सुधारणा अंतर्गत शासनास प्राप्त अंदाजत्रके मान्यतेसाठी सादर केली असून त्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर प्रगती पथावर आहे. तसेच पांझरा प्रकल्प वाढीव मुख्य कालवा २१ कि.मी. ते २८ कि.मी. मधील बांधकाम दुरुस्तीची कामे माहे एप्रिल २०२३ मध्ये क्षेत्रिय स्तरावर सुरु करण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिरकाडा (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) गावाजवळील हयूमन नदीवरील प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१०) १८०४७ (२५-०३-२०२३) श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरकाडा (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) गावाजवळील हयूमन नदीवर सन १९७८-१९८९ मध्ये प्रकल्प मंजूर असून ४५ वर्षे होऊनही प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळूनही प्रकल्पाचे कामे सुरु झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हयूमन प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) सदर प्रकल्पाची प्राथमिक कामे सन १९८२-८३ मध्ये सुरु करण्यात आली होती. मात्र वन कायद्यामुळे प्रकल्पाचे काम सन १९८४-८५ पासून बंद आहे.
(२) सदर प्रकल्पाच्या बांधकामाकरीता आवश्यक १९२५.५५ हेक्टर वनक्षेत्र वळते करण्यास केंद्र शासनाची तत्वतः मान्यता प्राप्त आहे. परंतु, हा प्रकल्प घनदाट व राखीव वनक्षेत्रात येत असल्याने प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात वाघांचा नैसर्गिक भ्रमणमार्ग खंडीत होऊ नये व कमीत कमी वनक्षेत्र बाधित व्हावे यासाठी आवश्यक उपाययोजना ठरविणे व धरण स्थळाची निश्चिती करण्याबाबतच्या पर्यायांचा अभ्यास प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे धामापूर (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) गावातील शेतजमिनींचे खाऱ्या पाण्यापासून संरक्षण करण्यासाठी पोई कालव्यावर बंधारा बांधून देणेबाबत

**(११) १८२३२ (२५-०३-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) मौजे धामापूर (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) गावातील शेतकऱ्यांच्या शेतात भरतीच्या वेळी शिरणाऱ्या कर्ली खाडीच्या खाऱ्या पाण्यापासून संरक्षण करण्यासाठी गावातून वाहणाऱ्या पोई कालवा बंधाऱ्यावर प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करुन कायमस्वरुपी उघड-झाप करणारी झडपे असलेला सिमेंट पक्का बंधारा बांधून देण्यासाठी या भागातील नागरिकांनी मा.जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग, उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, मालवण तसेच मा.केंद्रीय सूक्ष्म, लघु मध्यम उद्योग मंत्री महोदयांकडे माहे ऑक्टोबर, २०२२ अखेर प्रत्यक्ष भेटून अर्ज/निवेदने दिलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामस्थांच्या मागणीप्रमाणे धामापूर गावातून वाहणाऱ्या पोई कालव्यावर कायमस्वरुपी उघड-झाप करणारा पक्का सिमेंटचा बंधारा बांधून देण्याच्यादष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे तसेच केव्हापर्यंत बंधाऱ्याचे काम हाती घेवून पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१) होय.

मा.केंद्रीय सूक्ष्म, लघु मध्यम उद्योग मंत्री महोदयांनी तसेच, नागरीकांनी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद सिंधुदूर्ग तसेच उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, मालवण यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान प्रत्यक्ष भेटून दिलेले अर्ज/ निवेदने दिली आहेत.

तसेच ग्रामस्थ श्री.प्रशांत गंगाराम गावडे यांनी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचेकडे दिनांक १४/११/२०२२ रोजी अर्ज केला आहे.

(२) मौजे धामापूर गाव खारभूमी विभागाच्या बृहत आराखड्यात समाविष्ट नाही. तसेच या योजनांव्यतिरिक्त ज्या खाजगी खारभूमी योजना शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे त्या योजनांमध्येही या योजनेचा समावेश नाही. धामापूर गावातून वाहणाऱ्या पोई कालव्यावर सिमेंटचा बंधारा अस्तित्वात असून या बंधाऱ्याचे बांधकाम जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेले आहे. अर्जदारांनी खारे पाणी शेतात जाऊ नये म्हणून सदर बंधाऱ्यास उघडझाप करणाऱ्या झडपा बसविणेबाबत मागणी केली आहे. सदर बंधारा खारभूमी विभागाच्या अखत्यारीत नसल्याने सदरचे उघडझाप झडपा बसविण्याचे काम जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी करणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे शिगवण, आंबवणे (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील पोलीस पाटीलाचे रिक्त असलेले पद तातडीने भरण्याबाबत

**(१२) १८७८१ (१०-०५-२०२३) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शिगवण, आंबवणे (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील पोलीस पाटलाचे पद गेल्या अनेक वर्षापासून रिक्त असल्याने स्थानिक नागरिकांची गैरसोय होत असल्याची बाब दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गावातील रिक्त असलेले पोलीस पाटील पद तातडीने भरण्याबाबतची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी सातत्याने उपविभागीय अधिकारी, मंडणगड, जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदरहू गावातील रिक्त असलेले पोलीस पाटील पद तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
मंडणगड तालुक्यातील शिगवण व आंबवणे या गावाच्या पोलीस पाटील पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) पोलीस पाटील भरतीबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एम.फिल अहर्ताधारक प्राध्यापकांना कॅसचे लाभ देणेबाबत

**(१३) १९२२५ (०४-०८-२०२३) श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील एम. फिल अहर्ताधारक प्राध्यापकांना अद्यापही लाभ दिलेले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एम. फिल अहर्ताधारकांना हे लाभ देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एम. फिल अहर्ताधारकांना कॅसचे लाभ कधी देण्याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे वा आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (२१-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) एम.फील ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या प्राध्यापकांना कॅसचे लाभ देण्यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ०५/०९/२०२२ च्या पत्रान्वये स्पष्टीकरण दिले आहे. सदर स्पष्टीकरण विचारात घेऊन, दिनांक १६/०२/२०२३ च्या पत्रान्वये संचालक,उच्च शिक्षण यांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले आहे. “दिनांक १४/०६/२००६ पूर्वी ज्या अध्यापकांनी सेवेत असताना एम.फील अर्हता धारण केली असेल, तसेच ज्या अध्यापकांनी दिनांक १४/०६/२००६ पूर्वी नियुक्तीवेळी एम.फिल अर्हता धारण केली होती, अशा अध्यापकांची नियुक्ती जर विहित निवड समितीच्या माध्यमातून झाली असेल, तसेच अशा अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फील अर्हतेच्या आधारे नेट परीक्षेमधून सुट देऊन त्यांच्या नावासहित तसे संबंधित विद्यापीठांना कळविलेले असेल व विद्यापीठाने नियमित स्वरुपात मान्यता दिलेली असेल, तर (१) ज्या अध्यापकांनी नियुक्तीपूर्वी एम.फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना नियुक्तीपासून व (२) ज्यांनी सेवेत असताना एम.फील.अर्हता धारण केली असेल, त्यांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील.” वरील स्पष्टीकरण विचारात घेऊन संबधितांना कॅसचे लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा दुसरा हप्ता तसेच अंशकालीन शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना मानधनात वाढ मिळाली नसल्याबाबत

**(१४) १९२५१ (०४-०८-२०२३) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा दुसरा हप्ता अद्यापही मिळालेला नाही तसेच अंशकालीन शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना सुध्दा मानधनात वाढ मिळाली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या सातव्या वेतन आयोगाचा दुसरा हप्ता देण्याबाबत तसेच अंशकालीन शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना सुध्दा मानधनात वाढ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (०६-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतन सुधारणेसंदर्भात शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाने श्री.के. पी. बक्षी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ स्थापन केली होती.

सदर समितीच्या शिफारशी शासनाने स्वीकृत करण्याचा निर्णय वित्त विभाग, शासन अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ अन्वये घेण्यात आला असून त्यानुसार १ जानेवारी २०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला. ७ व्या वेतन आयोगाची थकबाकी सन २०१९-२० पासून पुढील ५ वर्षांत, ५ समान हप्त्यांत कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी योजनेच्या खात्यात जमा करण्याचा आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना रोखीने अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतची कार्यपध्दती शासन परिपत्रक वित्त विभाग, दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ अन्वये विहित केली आहे. तसेच राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना अथवा परिभाषित अंशदायी निवृत्तिवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या थकबाकीची रक्कम ५ वर्षांत, ५ समान हप्त्यांत रोखीने अदा करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक ३० मे, २०१९ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचे दुसरा, तिसरा व चौथा हप्त्यांचे प्रदान करण्याबाबत वित्त विभाग शासन निर्णय अनुक्रमे दिनांक ३० जून, २०२१, ०९ मे, २०२२ व २४ मे, २०२३ रोजी आदेश निर्गमित केलेले आहेत.

तसेच राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणीच्या अनुषंगाने नियत / एकत्रित वेतनावर असलेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ०१ मार्च, २०१९ अन्वये वेतन दरात सुधारणा करण्यात आली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(१५) १९६०३ (०४-०८-२०२३) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुण लाड : तारांकित प्रश्न क्रमांक १७७१२ ला दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने "क" आणि "ड" वर्ग शासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी या मागणीसाठी दिनांक १४ मार्च,२०२३ पासून बेमुदत संप पुकारला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याप्रकरणी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांचेसमवेत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह झालेल्या चर्चेनुसार, जुन्या पेन्शनच्या मागणीवर अभ्यास करण्यासाठी तीन निवृत्त सनदी अधिकाऱ्यांचे समिती नेमून समितीने तीन महिन्यात आपला अहवाल शासनास सादर करावा या मागणीवर एकमत होऊन कर्मचारी संघटनेने संप मागे घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने नियुक्त केलेल्या सदर समितीची रचना व कार्यकक्षा काय आहे व तसेच या समितीने शासनास आपला अहवाल सादर केला आहे काय,

(४) असल्यास, त्यादरम्यान शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागणीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (०५-०९-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली व जुनी निवृत्तिवेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करुन दिनांक १/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीअंती खात्रीशीर आर्थिक व सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजनेबाबतची शिफारस ३ महिन्यात शासनास सादर करण्यासाठी वित्त विभागाच्या क्रमांक : संकीर्ण-२०२३/ प्र.क्र.२९/ सेवा-४, दिनांक १४/०३/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीस दिनांक २७/०७/२०२३ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १४/०६/२०२३ पासून पुढील दोन महिन्यासाठी मुदतवाढ देण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल अद्यापपर्यंत शासनास सादर केलेला नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पंढरपूर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या कार्यकारी अधिकारी पदाच्या नियुक्तीबाबत

**(१६) १९६२६ (०४-०८-२०२३) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कामकाज पाहण्यासाठीचे कार्यकारी अधिकारी पद मागील दिड वर्षापासून रिक्त असल्याने तेथे पूर्णवेळ मुख्य कार्यकारी अधिकारी मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कामकाज पाहण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी पद पूर्णवेळ भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०२३) :** (१) व (२) श्री.राजेंद्र शेळके , उपविभागीय अधिकारी धर्माबाद, नांदेड यांची कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र.टिआरएएफ-०४२३/प्र.क्र.९७/ई-२,दिनांक ०४ मे, २०२३ अन्वये ३ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच विभागाच्या कार्यालयीन आदेश क्र.पीटीए१३२३/प्र.क्र.१२८/का १६, दिनांक १६/०६/२०२३ अन्वये श्री.शेळके यांना सदर पदावर दिनांक १६/०६/२०२३ पासून रुजू करुन घेण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव (जि.जळगाव) शहरात भरवस्तीत कालिका माता मंदिर रोडवरील स्टेट बँकेचे शाखेत दरोडेखोरांनी दरोडा टाकून १७ लाख रुपये रोख व सुमारे ३ कोटी रुपयांचे सोने लंपास केल्याबाबत

**(१७) २०१३८ (०४-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव (जि.जळगाव) शहरातील कालिका माता मंदिर रोडवरील स्टेट बँकेच्या शाखेवर दरोडेखोरांनी दरोडा टाकून १७ लाख रुपये रोख व सुमारे ३ कोटी रुपयांचे सोने लंपास केल्याची घटना दिनांक १ जून २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात वारंवार अशा घटना घडत असल्याने यावर शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाकडून संबंधित दरोडेखोरांना पकडून त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही कली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१) होय.

सोने व रोख रक्कम अशी एकूण रुपये ३ कोटी ७७ लाख रकमेची चोरीची घटना घडली आहे.

(२) अशा घटना घडू नये म्हणून खालील उपाययोजना केल्या जातात :-

अ) कोम्बींगव्दारे गुन्हेगार पकडणे, वेळोवेळी नाकाबंदी लावणे, रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर निगरानी ठेवणे, दरोडा प्रतिबंधक पथकांव्दारे गस्त ठेवणे, गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करणे.

ब) गावातील पोलीस पाटील, पोलीस मित्र युवक गट व नागरीक यांच्या सभा घेऊन जनजागृती करणे, इत्यादी.

क) पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील बँक, पतपेढी, एटीएम यांची माहिती घेऊन सुरक्षाविषयक आढावा घेण्यात येतो.

(३) सदर घटनेबाबत शनिपेठ पोलीस स्टेशन, जळगाव येथे गु.र.नं.९३/२०२३ भा.द.वि. कलम ३९४ अन्वये दिनांक ०१/०६/२०२३ रोजी गुन्हा दाखल केला आहे. सदरहू गुन्ह्यात ३ आरोपींना अटक करण्यात आले असून चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सूरू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## अन्नधान्य, दूध, मिठाई, यासारख्या पदार्थात होणारी भेसळ रोखण्याकरिता मोबाईल प्रयोगशाळा सुरु करण्याबाबत

**(१८) २०२२३ (०४-०८-२०२३) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्नधान्य, दूध, मिठाई, यासारख्या पदार्थात मोठ्या प्रमाणात होणारी भेसळ रोखण्याकरिता व भेसळ करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याकरिता मोबाईल प्रयोगशाळा सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे वा करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम (०८-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडून Central Sector Scheme या योजनेंतर्गत "Strengthening of Food Testing System in the Country including Provision of Mobile Food Testing Laboratories" अन्न व औषध प्रशासनास एकूण दोन फिरत्या अन्न चाचणी प्रयोगशाळा प्राप्त झाल्या आहेत.

सदर फिरत्या अन्न चाचणी प्रयोगशाळेचा वापर राज्यातील जनतेमध्ये अन्न सुरक्षेविषयी जन जागृती करण्याकरीता आणि भेसळमुक्त अन्न उपलब्ध करणेकरीता होत असून सद्य:स्थितीत FSW (Food Safety on Wheels) चे माध्यमातून चाचणी, जागरूकता आणि प्रशिक्षण देण्याबाबतचे कामकाज करण्यात येते.

अन्न सुरक्षा कार्यप्रणालीचे बळकटीकरण करण्याकरीता अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली व अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार दिनांक २२/०९/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार GeM पोर्टलवरून फिरत्या प्रयोगशाळा खरेदी करण्याकरीता निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकृषी विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत

**(१९) २०५०९ (०४-०८-२०२३) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने दिनांक ७ ऑक्टोबर,२०२१ च्या शासन निर्णयाद्वारे अकृषी विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत नेमलेल्या समितीने अहवाल शासनास दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समितीने दिलेल्या अहवालातील शिफारशींचा थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदरच्या शिफारशींची अंमलबजावणी कधीपासून करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (२१-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) समितीने शिक्षकीय/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे/ थकबाकी प्रदान करणे, आश्वासित प्रगती योजना लागू करणे इत्यादी स्वरुपाच्या शिफारशी केल्या आहेत.

(३) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी प्रदान करणे व सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, अहवालातील इतर शिफारशी, समितीचा अहवाल नियमानुसार तपासून सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयात एक हजार शिक्षकांची भरती करण्याबाबत

**(२०) ४१८११ (०१-०८-२०१८) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने शासनाने कनिष्ठ महाविद्यालयात एक हजार शिक्षकांची भरती करण्यास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पदांपैकी ९३५ पदांना आतापर्यंत मान्यता दिली असून त्यापैकी ३३६ पदांचे वेतन सुरु करण्यात आले परंतु, उर्वरित मंजूर पदांना अद्याप वेतनश्रेणी लागू करण्यात आली नाही, हे खरे आहे काय, तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील ४२८ शिक्षकांची पदे रद्द करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील खाजगी अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षकांची भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (११-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) पदांना मान्यता दिल्यानंतर सहा महिन्याहून अधिक काळ रिक्त राहील्यामुळे वित्त विभागाने ४२८ पदे दिनांक ०९/०४/२०१८ च्या शासन निर्णयान्वये व्यपगत केली आहेत. तद्नंतर सदर व्यपगत पदांपैकी वित्त विभागाच्या दिनांक १४/११/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये ६८ पदे तर दिनांक २५/०४/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये २११ पदे अशी एकूण २७९ पदे पुनर्जिवित करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.